मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरूवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ । पान १

# पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र पोस्ट निर्मिती करावी

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची मागणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाच्या धर्तीवर आता पिंपरी-चिंचवड पोस्ट मुख्यालय निर्मिती करावी. ज्यामुळे शहर आणि परिसरातील पोस्ट ग्राहकांना सेवेचा लाभ घेता येईल आणि कामकाजात सुसूत्रता येईल, अशी मागणी भाजपा आमदार तथा शिरुर लोकसभा निवडणूक प्रमुख महेश लांडगे यांनी केली आहे.याबाबत केंद्रीय मंत्री, माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन पाठवण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पुणे विभागीय पोस्ट कार्यालयाअंतर्गत पिंपरी-चिंचवड शहराचा समावेश आहे. मुख्य कार्यालयातूनच पुणे जिल्ह्याच्या पश्चिम, पूर्व आणि ग्रामीण भागाचा कामकाज सुरू आहे. यामुळे पुणे जिल्ह्याची लोकसंख्या दोन कोटींच्या जवळपास आहे. पोस्ट ऑफीसच्या कामकाजाचे नियंत्रण पुण्यातील मुख्यालयाच्या माध्यमातून केले जाते. वास्तविक, पिंपरी-चिंचवड शहर ही 'मेट्रो सिटी' म्हणून नावारुपाला येत आहे. वाढती लोकसंख्या आणि प्रशासकीय कामकाजातील सूसुत्रता यासाठी जिल्हा विभाजन धोरणानुसार, पुणे व पिंपरी-चिंचवड (शिवनेरी) असे दोन जिल्हे स्वतंत्र व्हावेत, असा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडे विचारधीन आहे. २०१८ मध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाचे विभाजन करुन पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यात आले. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आली आहे. त्याच धर्तीवर पिंपरी- चिंचवडसाठी भारतीय डाक विभागाचे स्वतंत्र विभागीय कार्यालय निर्माण करावे, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.






> “ केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या माध्यमातून दि. २४ जून २०२१ रोजी सर्व विभागीय डाक कार्यालयांना पत्र पाठवण्यात आले आहे. त्यामध्ये विभागीय पोस्ट आणि कार्यालयाचे विभाजन याबाबत निर्देश दिले आहेत. त्या अनुसरून पुणे विभागीय पोस्ट मुख्यालयाचे विभाजन करुन पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोस्ट मुख्यालय निर्माण करावे, अशी विनंती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना केली आहे. याबाबत नवी दिल्ली येथे लवकरच मंत्रीमहोदय यांची भेट घेणार आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार तथा शिरूर लोकसभा निवडणूक प्रमुख, भाजपा.

# विश्व हिंदू परिषद आयोजित भव्य चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण

## या स्पर्धेत पिंपरी चिंचवड शहरातील जवळपास ४२ शाळांनी नोंदवला सहभाग

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
विश्व हिंदू परिषद पिंपरी चिंचवड व कलारंग सांस्कृतिक कलासंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या आगमनानिमित्त भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या स्पर्धेचे बक्षिस वितरण समारंभ नुकताच चिंचवड येथे करण्यात आले. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड शहरातील जवळपास ४२ शाळांनी, इयत्ता सहावी ते बारावी मधील १६३५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.या स्पर्धेमध्ये रामायणातील प्रसंगा वरील विषय देण्यात आले होते. त्यात १) श्रीराम व शबरी भेट, २) श्रीराम व केवट भेट, ३) नल नील व प्रभू श्रीराम, ४) रावण वध, ५) आपल्याला आवडणारा रामायणा मधिल प्रसंग, आशा विविध विषयांवर चित्र काढायची स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला भाजपा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप, आमदार अश्विनी जगताप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी चिंचवड जिल्हा कार्यवाह माहेश्वरी मराठे, सामाजिक कार्यकर्ते सचिन लांडगे, नितिन वाटकर, पुणे ग्रामीण विभाग मंत्री विश्व हिंदू परिषद तसेच विश्व हिंदू परिषदेचे पिंपरी चिंचवड अध्यक्ष धनंजय गावडे, माजी नगरसेविका आनुराधा गोरखे, संदेश गादिया, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, एक चित्र मला असे दिसले, ज्यात मोदीजी लहान राम ललाला श्री राम मंदिरात घेऊन जात आहेत, हे चित्र मला खूप भावले. आणि अयोध्येतील श्री राम मंदिरात प्रभू श्री रामाची प्राणप्रतीष्ठा झाली हे पाहुन पुनश्च एकदा रामराज्याचा शुभारंभ झाला असे या लहानग्या नी काढलेल्या चित्रातून वाटले. रा.स्व.संघाचे माहेश्वरी मराठे यांनी स्पर्धेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले, यावेळी बोलताना म्हणाले, स्वामी विवेकानंद यांच्या सारखे देशभक्तीचे प्रेम या चित्रातून दिसून येते. भारत देशाचे भविष्य घडवणारे हे कलाकार आहेत असे त्यांनी संबोधले. एकाच वेळी १६०० पेक्षा जास्त विद्यार्थी श्री रामाच्या जीवनाचा अभ्यास करून चित्र रेखाटतात,हे या स्पर्धेचे मोठे यश आहे, मुला मुलींनी काढलेली चित्र प्रतिभावंत कलाकारांना लाजवतील अशी आहेत. आमदार आश्विनी जगताप यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, या लहान चित्रकारांनी या चित्रकलेतून श्री रामाचे चित्र काढली हीच मुले उद्याचे देशाची भवितव्य आहेत, ती पुढे जाऊन आशीच सुंदर भारतमाता ही घडवतील हिच अपेक्षा. विश्व हिंदू परिषदेचे नितीन वाटकर यानी ही आपले मनोगत मांडताना म्हणाले की, आयोध्येतील प्रभू श्री राम यांचे मंदिर हिंदू च्या ५०० वर्षाच्या संघर्षातून उभे राहिले आहे. आणि आपल्या सर्वांचे भाग्य आहे की त्यांचे लोकार्पण आपल्याला प्रत्यक्षात पहायला मिळाले.



# पिंपरी चिंचवडमध्ये भाजपाच्या घर चलो अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद

## शंकर जगताप यांनी घेतल्या घरोघरी जाऊन नागरिकांच्या भेटी..!

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी शहरातील प्रत्येक नागरिकांपर्यंत केंद्र व राज्य या दोन्ही सरकारने केलेली कामे पोहोचवण्यासाठी ४ फेब्रुवारीपासून शहरात घर चलो अभियान राबविण्यात येत असून, या अभियानाला पिंपरी चिंचवड शहरवासियांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत आहे. या अभियानांतर्गत भाजपाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी त्यांच्याकडील सोपविलेले बूथ क्रमांक १०९, ११० आणि १११ वरील नागरिकांशी संवाद साधला. दोन सत्रांमध्ये बिजलीनगर, शिवनगरी, गिरिराज या भागातील ७० घरांमध्ये जावून मोदी सरकारच्या लोकोपयोगी योजनांची माहिती दिली. सकाळी ९ वाजता बूथ प्रमुख- विवेक चिटणीस यांच्या घरी चहा – नाष्टा करून अभियानाला सूरूवात झाली. पहिल्या सत्रात या भागातील ७० घरांमध्ये जावून नागरिकांसोबत संवाद साधून मोदी सरकारचा दहा वर्षातील विकास, विविध लोकोपयोगी योजनांची माहिती देवून २०४७ पर्यंत आत्मनिर्भर भारत आणि महासत्ता करण्याच्या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिस-यांदा पंतप्रधान बनविण्याच्या दृष्टीने आवाहन करण्यात आले. तसेच, सामाजिक कार्यकर्ते संभाजी (नाना) मरळ यांच्या घरी भोजन करून उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, माजी नगरसेविका मोनाताई कुलकर्णी, माजी सत्तारुढ पक्षनेते शामराव वाल्हेकर, बाजीराव चिंचवडे, सुपर वॉरिअर सचिन गोसावी, अनिकेत दळवी, महेश घुले, महेश कलाल, मुरलीधर चोपडे, जयवंत भोसले आदी उपस्थित होते. शंकर जगताप म्हणाले की, देशात सेवा, सुशासन आणि गरीबांचे कल्याण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने राबवलेल्या योजना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने २०१४ ते २०२४ या दहा वर्षांच्या काळात देशाच्या सर्वच क्षेत्रात प्रचंड गतीने विकास केला आहे. गरीब कल्याण, महिला सशक्तीकरण, देशांतर्गत व बाह्य सुरक्षा अशा अनेक क्षेत्रात मोदी सरकारने मोठी कामगिरी करून आंतरराष्ट्रीय पातळीवरही देशाचे नाव उंचावले आहे. त्याचप्रमाणे देशातील भाजपशासित राज्यांनीही मोठा विकास केला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जात असताना केंद्र व राज्य सरकारांची हीच विकासाची गाथा तळागाळापर्यंत पोहोचविण्यात येत आहे. त्यासाठी दि. ४ ते ११ फेब्रुवारी या काळात घर चलो अभियान राबविण्यात येत आहे. घर चलो अभियानांतर्गत केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती देण्यासाठी दोन सत्रात घरोघरी जाऊन नागरिकांशी संवाद साधण्यात आला. तसेच, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची नागरिकांना माहिती देण्यात येत आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघात प्रत्येक बुथ कार्यकर्त्याकडून हे अभियान राबविले जात आहे. त्याला पिंपरी चिंचवडकरांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे, असे शंकर जगताप यांनी सांगितले.



# पिंपरी चिंचवड विद्यार्थ्यांना मिळणार दर्जेदार शिक्षण!

## एस.बी. पाटील यांनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर : हर्षवर्धन पाटील

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) ३३ वर्षांपासून शैक्षणिक सेवा देण्याचे कार्य करीत आहे. पीसीईटी अंतर्गत शैक्षणिक संस्थांमधून आतापर्यंत हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. आता संस्थेने एक पाऊल पुढे टाकत पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु) सुरू केले आहे. साते, वडगांव मावळ येथे विस्तीर्ण क्षेत्रात अत्याधुनिक शैक्षणिक सुविधांनी युक्त सुसज्ज, दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार आहे, असे पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.माध्यम प्रतिनिधींनी नव्याने सुरू झालेल्या पिंपरी चिंचवड विद्यापीठास (पीसीयु) बुधवारी भेट दिली. यावेळी कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी उपस्थितांशी संवाद साधला. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आदी उपस्थित होते.१६ जानेवारी २०२३ मध्ये पीसीईटीच्या पिंपरी चिंचवड विद्यापीठाची घोषणा शासनाने केली आणि सहा मे २०२३ मध्ये मान्यता मिळाली. यानंतर त्वरेने निर्णय घेत विद्यापीठाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राबविताना देशभरातून विद्यार्थी पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. सुमारे ९३ हजार विद्यार्थ्यांनी चौकशी तर दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरले त्यातील दीड हजार विद्यार्थ्यांनी विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला, असे विद्यापीठाने अनेक अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने एमबीए इंटरनॅशनल, इंटरनॅशनल स्टडी टूर सॅप सर्टिफिकेशन, तसेच दुहेरी स्पेशलायझेशन – विपणन, वित्त, व्यवसाय विश्लेषण, माहिती तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि मीडिया व्यवस्थापन, मानव संसाधन व्यवस्थापन, कृषी व्यवसाय व्यवस्थापन, फार्मास्युटिकल व्यवस्थापन, दहा पेक्षा अधिक मूल्यवर्धित प्रमाणपत्रे, नोकरी सुरक्षित कार्यक्रम. संगणक शास्त्र, व्यवस्थापन, आहारशास्त्र, क्लिनिकल मानसशास्त्र अन्य अभ्यासक्रम फार्मास्युटिकल, संगणक विज्ञान, एआय आणि एमएल, मास मीडिया आणि पत्रकारिता, डिजिटल फिल्म मेकिंग, कायदा, डिझाइन, आरोग्य विज्ञान, , कला (इंग्रजी, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र इ.) व पीएचडी आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

# राष्ट्रवादी भवनावरील चिन्ह हटविले

## शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगतापांच्या डोळ्यात पाणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष आणि पक्षाचे घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांना देण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे पडसाद बुधवारी शहरात उमटले. शरद पवार समर्थकांकडून शिवाजीनगर येथील राष्ट्रवादी भवनातील अजित पवार यांचे नाव असलेली कोनशिला फोडण्यात आली.



त्यावरून अजित पवार आणि शरद पवार समर्थकांमध्ये काही काळ वादावादी झाली. त्यानंतर शरद पवार गटाकडून राष्ट्रवादी भवनावरील घड्याळ चिन्ह हटविण्यात आले. दरम्यान, शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध सभा घेत शरद पवार यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहून आगामी निवडणुकीत विरोधकांना पराभूत करण्याचा निर्धार करण्यात आला.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर पक्षाचा ताबा आणि चिन्ह अजित पवार यांच्याकडे राहील, असा निकाल केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी दिला होता. त्यानंतर शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस भवनात निषेध सभा झाली.भारतीय जनता पक्षाने देशावर त्यांचा एकछत्री अंमल राहावा या मानसिकतेतून देशातील सर्वच प्रादेशिक पक्षांना उध्वस्त करण्याचे धोरण अवलंबले आहे. शरद पवार यांनी अथक परिश्रमातून उभा केलेला पक्ष अजित पवार यांनी एका रात्रीत भाजपच्या झोळीत टाकला, असा आरोप यावेळी करण्यात आला. बैठकीनंतर भाजपच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी शरद पवार गटाच्या काही कार्यकर्त्यांनी अजित पवार यांचे नाव असलेली कोनशिला हातोडीने फोडली.दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर अजित पवार समर्थकांनी राष्ट्रवादी भवनात धाव घेतली. त्यामुळे दोन्ही गटाचे कार्यकर्ते आणने-सामने आले. मात्र संतप्त भावनेतून हा प्रकार घडल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला. त्यावेळी दोन्ही गटात किरोकळ वादावादी झाल्याची माहिती शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस भवनातील पक्षाचे नाव काळ्या कापडाने झाकण्यात आले असून घड्याळ हे निवडणूक चिन्हही हटविण्यात आले. निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्यात आल्यानंतर आता त्याचे पडसाद कार्यालयांमध्येही उमटू लागले आहेत. पक्ष आणि चिन्हाचा फैसला झाल्यानंतर राज्यातील कार्यालयांमध्ये सुद्धा वाद जाऊन पोहोचला आहे. आज (७ फेब्रुवारी) पुण्यामध्ये शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी कार्यालयावरील घड्याळ चिन्ह हटवलं. यावेळी कार्यालयावरील चिन्ह काढताना डोळ्यांमध्ये अश्रु अनावर झाले. जगताप यांनी आपल्या गाडीवरील सुद्धा घड्याळ चिन्ह कढून टाकले. २४ वर्षापासून कार्यालय पाहत असताना हे दिवस येतील, असे वाटलं नव्हतं, असे ते म्हणाले. दरम्यान, पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या कार्यालयाबाहेर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. राष्ट्रवादी कार्यालयावरील चिन्ह काढण्यात आल्यानंतर नाव देखील काळ्या कापडाने झाकण्यात आला आहे. शरद पवारांकडून चिन्ह आणि नाव गेल्यानंतर पुण्याचे शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप भावूक झाले. चिन्हाची पाटी काढताना जगताप यांच्या डोळ्यात अश्रू आले. चिन्ह काढून पाटी झाकण्यात आल्यानंतर अजित पवार गटाचा कार्यकर्ता यावेळी जाब विचारण्यासाठी पोहोचला. अजित पवारांच्या नावाची तोडफोड करण्यात आल्याचा आरोप करत जाब विचारण्याचा पयत्न केला. अजित पवार गट उपाध्यक्ष दत्ता सागरे आक्रमक झाले.

# शरद पवार हाच आमचा पक्ष आणि निवडणूक चिन्ह!

## विचारांची लढाई कायम राहील : युवक शहराध्यक्ष इम्रान शेख

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
शरद पवार हाच आमचा पक्ष आणि निवडणूक चिन्ह आहे विचारांशी गद्दारी केलेल्या लोकांना जनता माफ करणार नाही. आगामी काळात जनतेच्या न्यायालयात न्याय मिळणार आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वात विचारांची लढाई कायम राहील, असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी केला आहे.



राष्ट्रवादीपक्ष व चिन्हाच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर सरकार व निवडणूक आयोग यांच्या विरोधात पिंपरी-चिंचवड शहर शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने डॉ. आंबेडकर चौक येथे जोरदार निदर्शने केली. यावेळी युवक शहराध्यक्ष इमरान शेख, महिला शहराध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर, युवक कार्याध्यक्ष सागर तापकीर, प्रवक्ते माधव पाटील, भोसरी विधानसभा अध्यक्ष संतोष शिंदे,वरिष्ठ उपाध्यक्ष काशिनाथ जगताप, महिला उपाध्यक्ष रेखा मोरे, जिल्हा सरचिटणीस मेघराज लोखंडे, शहर संघटक अश्फ शेख, राजेश हरगुडे, नितीन मोरे, सचिन शिंदे, हाजी मलंग शेख, समाधान आचलखांब, तनवीर अहमद, पियुष अंकुश, साहिल वाघमारे,मयूर खरात,उमेश धोत्रे आणि मोठ्या संख्येने राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. ''पक्ष गेला, चिन्ह गेले राहिला तो विचार त्याचे नाव शरदचंद्र पवार'' अशा घोषणा देत युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने निदर्शने करण्यात आली.आले शंभर गेले शंभर शरद पवार एक नंबर, आमचा पक्ष आमचे चिन्ह शरद पवार शरद पवार या जोरदार घोषणा देण्यात आल्या. शहरातील राजकीय वर्तुळात शरद पवार गटाला मोठी सहानुभूती मिळताना दिसत आहे.

# पुण्यात खांदेपालटाचा कार्यक्रम सुरूच

## पोलिस आयुक्तांनंतर आता जिल्हाधिकारी सुद्धा बदलले!



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यात पोलिस आयुक्त बदलण्यात आल्यानंतर आता जिल्हाधिकारी सुद्धा बदलण्यात आले आहेत. पुणे जिल्हाधिकारीपदी सुहास दिवसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मावळते जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांची क्रीडा व युवक कल्याण आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वीच पुणे पोलिस आयुक्तांची सुद्धा बदली करण्यात आली आहे. रितेश कुमार यांच्या जागी नागपूरहून अमितेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली होती. पुण्यातील विभागीय आयुक्तांची सुद्धा बदली करण्यात आली आहे.दुसरीकडे, पुणे शहरातील ७०० पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या १४ फेब्रुवारीला होणार आहे. पाच वर्षांपासून अधिक काळ एकाच पोलिस ठाण्यात आणि विभागात कार्यरत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या समावेश असलेल्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत. एकाच पोलिस ठाण्यात तसेच गुन्हे शाखा, वाहतूक शाखा, विशेष शाखा आणि पोलिस मुख्यालयात पाच वर्षांपेक्षा अधिक काळ ठाण मांडून बसलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी मागवली आहे. येत्या १४ आणि १५ फेब्रुवारी रोजी पोलिस कर्मचार्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात येणार आहे. पोलीस कर्मचार्यांच्या बदल्या या संबंधित पोलिस कर्मचार्यांना समोर बोलावून त्यांनी मागितलेल्या तीन पर्यायानुसार करण्यात येणार आहे. दरम्यान, पुण्याच्या पोलिस आयुक्तपदी अमितेश कुमार यांची नियुक्ती करण्याचे आदेश गृह विभागाकडून देण्यात आल्यानंतर रितेश कुमार यांची पदोन्नतीने राज्य राखीव पोलीस दलाच्या समादेशकपदी नियुक्ती करण्यात आली. गेल्या दोन महिन्यापासून रिक्त असलेल्या पुणे पोलिस पोलीस दलातील सह पोलीस आयुक्तपदी कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीण पवार यांची नियुक्ती करण्यात आली. राज्यातील ५९ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश गृह विभागाने दिले होते. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे यांची अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षकपदी बदली करण्यात आली.

### पुणे पोलिस दलातही खांदेपालट

» गुन्हे शाखेच्या अतिरिक्त पोलीस आयुक्तपदी राज्य राखीव दलाचे समादेशकशैलेश बलकवडे यांची नियुक्ती करण्यात आली. पुणे पोलिसांच्या उत्तर विभागाचे अतिरिक्त आयुक्त रंजनकुमार शर्मा यांची राज्य गुन्हे अन्वेषण विभागात आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली. त्यांच्या जागी मुंबईचे पोलीस उपायुक्त मनोज पाटील यांची नियुक्ती करण्यात आलीपुण्यात पोलिस आयुक्त बदलण्यात आल्यानंतर आता जिल्हाधिकारी सुद्धा बदलण्यात आले आहेत. पुणे जिल्हाधिकारीपदी सुहास दिवसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# तरीही फणा काढतातच, पण मी बी पक्का गारुडी!

## शर्मिला ठाकरेंनी संकेत देताच वसंत मोरेंच्या स्टेट्सने भूवया उंचावल्या





**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी पुण्यात बोलताना साईनाथ बाबरांना मोठी संधी देण्याबद्दल सुतोवाच केले होते. यानंतर आता पुण्यातील मनसे नेते वसंत मोरे यांनी सूचक व्हाट्सअॅप स्टेट्स ठेवल्यानंतर पुन्हा एकदा मनसेच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. शर्मिला ठाकरे यांच्या दौऱ्यानंतर काही तासांमध्येच त्यांनी स्टेट्स ठेवत राजकीय खळबळ उडवून दिली आहे. वसंत मोरे यांनी सूचक व्हाट्सअॅप स्टेट्स ठेवत म्हटले आहे की, ''कुणासाठी कितीबी करा वेळ आली की फणा काढतातच पण मी बी पक्का गारुडी आहे, योग्य वेळी सगळी गाणी वाजवणार.'' त्यामुळे वसंत मोरे यांनी नेमका कोणाला संदेश दिला आहे याची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे शर्मिला ठाकरे यांनी साईनाथ बाबर यांना खासदारकीचे संकेत दिल्यानंतर वसंत मोरे यांची सोशल प्रतिक्रिया आली आहे. दुसरीकडे, काही दिवसांपूर्वीच वसंतला मला दिल्लीला पहायचं आहे, असं शर्मिला ठाकरे यांनीच म्हटले होते. आता शर्मिला ठाकरे यांनी साईनाथ बाबर यांच्या कार्यक्रमांमध्ये साईनाथ बाबर यांना आता महापालिकेत पाहायचं नसून मोठ्या पदावर पाहायचं असल्याचे सांगितले. नेमकं आता हे स्टेटस कोणासाठी असा सवाल उपस्थित होत आहे. दुसरीकडे, पुणे लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी साईनाथ बाबर आणि वसंत मोरे यांच्यात रस्सीखेच सुरु असल्याचे स्पष्ट होते. दरम्यान, या कार्यक्रमात बोलताना शर्मिला ठाकरे यांनी मार्च एप्रिलमध्ये लोकसभा निवडणुका होतील. ऑक्टोबरला विधानसभा निवडणूक होतील, पुढील वर्षी महापालिका निवडणूक होतील. कोरोना काळात सत्ताधारी पक्ष कोरोना काळामध्ये बंगल्यात बसून होते, अशी अप्रत्यक्ष टीका उद्धव ठाकरे यांच्यावर केली. तेवढी कोणत्याही पक्षाने केली नसल्याचा दावा केला. तेव्हा सगळे सत्ताधारी बंगल्यात बसले होते, आमचा पक्ष रस्त्यावर होता. आमची चांगली मुलं कोरोनामध्ये दगावली असे त्यांनी यावेळी सांगितले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी पुण्यात बोलताना साईनाथ बाबरांना मोठी संधी देण्याबद्दल सुतोवाच केले होते.